I.O. प्रत.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**FIRST INFORMATION**

**(Under Section 154**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): नांदेड     **P.S.**(ठाणे): मुखेड

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0147     **Year** (वर्ष): 2023

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ):13/05/2023 19:38

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): शनिवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From** (दिनांक पासून): 13/05/2023
   **Date To** ( दिनांक पर्यंत): 13/05/2023
   **Time From** (वेळेपासून): 12:36 बजे
   **Time To** (वेळेपर्यंत): 13:55 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 13/05/2023     **Time** (वेळ): 19:26 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

**Entry No.** (नोंद क्र.): 027

**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 13/05/2023 19:26 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

पूर्व, 6 किमी     **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): सलगरा खू, सलगरा खू,मूखेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रामेष्वर पूंडलिक घायाळ

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** पूंडलिक

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1997

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सलगरा खूर्द ,मूखेड ,मुखेड,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सलगरा खूर्द ,मूखेड ,मुखेड,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9552292927

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | ज्योती खंडेराव पवार | | पती का नाम : खंडेराव | 1. सलगरा खूर्द ,मूखेड ,मुखेड, नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | शांताराम देविदास गवई | | वडील का नाम : देवीदास | 1. मूखेड ,मूखेड,मुखेड,नांदेड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रूपये दराचे 10 नोटा | 5,000.00 |



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

कॅम्प पोलीस स्टेषन मुखेड.
दिनांक 13/05/2023.
फिर्याद
मी रामेश्वर पूंडलिक घायाळ वय 26 वर्ष व्यवसाय शेती रा. सलगरा ख्रु ता.मुखेड जि. नांदेड. मोबाईल नंबर9552292927.
मी वरील ठिकाणचा राहाणार असुन शेत मजुरी करून परीवाराचा उदरनिर्वाह करतो.
समक्ष पोलीस स्टेशन मुखेड जिल्हा नांदेड येथे हजर येवुन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे राहणारा असुन शेतमजुरी करून परीवाराचा उदरनिर्वाह करतो. " मी दिनांक 01/05/2023 रोजी पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड कार्यालयात तक्रारी जबाब दिला होता. तो खालील प्रमाणे आहे.
मी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे येवून तक्रार देतो की, मी वरील ठिकाणी माझे कूटंबासह राहतो. तसेच शेतमजूरी करून माझा उदरनिर्वाह करतो . माझे षिक्षण बी.ए. व्दितीय वर्शापर्यत झाले असून मला मराठी भाशा लिहता व वाचता येते .

माझे मूळ गाव सलगरा खुर्द असून सदर ठिकाणी वार्ड नंबर 02 मध्ये माझे आईचे नावाने कच्चे घर असून सदर ठिकाणी रमाई आवास योजने अंतर्गत घरकूल योजनेचा लाभ मिळावा याकरीता मी दि.06/03/2023 रोजी ग्रामपंचायत कार्यालय सलगरा खुर्द येथे लेखी अर्ज केला होता. त्यावेळी मी सलगरा खुर्द येथील सरपंच महीला नामे सौ. ज्योती पवार यांना भेटलो होतो. व त्यांना घरकूल योजना अंतर्गत घरकूल मिळावे याकरीता विनंती केली होती तेव्हा त्यांनी तूमचे घरकूलाचे प्रस्ताव मंजूर करावयाचा असेल तर मला 5000 रू दयावे लागतील असे सांगितले होते. माझे माहीतीप्रमाणे गोरगरीब लोकांना शासनातर्फे घरकूल हे विनामूल्य मिळत असून, त्याकरीता कोणतीच फी लागत नाही, त्यामूळे सरपंच सौ.ज्योती पवार मागत असलेले पाच हजार रूपये हे लाच असून मला त्यांना माझे नमूद कामाकरीता लाच देण्याची इच्छा नसल्यामूळे त्यांचे विरूध्द कार्यवाही व्हावी याकरीता लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,नांदेड येथे येवून कार्यवाही होण्यासाठी तक्रार देत आहे.

सौ. ज्योती पवार हे माझे घरकूलाचा प्रस्ताव मंजूर करणार नाहीत म्हणून मी त्यांना भेटलो त्यावेळी पाच हजार रूपये देण्यासाठी होकार देवून आलो. माझे व त्यांचे कूठलीही पूर्व दूष्मनी किंवा वैमान्यस नाही तसेच आमच्यात कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नाही.

मी दि.02/05/2023 रोजी ग्रामपंचायत कार्यालय, सलगरा खूर्द या ठिकाणी सरपंच सौ.ज्योती पवार यांना समक्ष भेट्न त्यांना माझे घरकूलाचे प्रस्ताव मंजूर करण्यासाठी विनंती करणार आहे. त्यांनी सदर कामासाठी स्वता किंवा इतरामार्फत लाचेची मागणी केल्यास तसेच लाचेची रक्कम स्वता किंवा इतरामार्फत स्विकारल्यास त्यांचे विरूध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी ही विनंती." वगैरे मजकुराची सविस्तर टंकलिखीत तक्रार दिली असुन तक्रारीवर माझीच सही आहे.

सदर तक्रारीचे अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्रीमती स्वप्नाली धुतराज यांनी दोन शासकीय पंच उपलब्ध करून घेतले. दिनांक 02/05/2023 रोजी सलगरा बु. महादेव मदीराच्या परीसरात बोलावुन मला दोन्ही पंचाची व सापळा पथकातील सर्व सदस्यांची ओळख करून दिली. त्यानंतर मी पंचाना माझी तोंडी तक्रार सांगीतली. त्यानंतर पंचानी माझी टंकलिखीत तक्रार वाचुन ज्यावर माझी व पोलीस निरीक्षक धुतराज मॅडम यांची पुर्वीच सही असलेली तक्रारीवर दोन्ही पंचानी पण सहया केल्या आहेत.

त्यानंतर मला व दोन्ही पंचाना लाच मागणी पडताळणीचा उद्देश सांगुन माझे स्वतःचे, पोलीस निरीक्षक व दोन्ही पंचांचे परीचय दर्शक वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर लोकसेवक श्रीमती ज्योती पवार (सरपंच) यांना भेटण्यासाठी मी व पंच क्रमांक एक माधव व्यंकटी बिडवे असे आम्ही माझ्या ताब्यातील शाईन वाहन क्रमांक एम एच 26 आर 342 ने सलगरा बु. महादेव मंदीराच्या परीसरातुन ग्राम पंचायत कार्यालय सलगरा ता.



Scanned with OKEN Scanner

मुखेड जि.नांदेड येथे लाचमागणी पडताळणी करण्यास गेलो असता मी लोकसेवक सरंपच ज्योती पवार मॅडमला भेटलो व कामा विशयी बोलणे केले असता तिने मला कळविले की, " घरकुलाच्या कामा करीता आधार कार्ड किंवा पॅन कॉर्ड कागदपत्राची पुर्तता करण्यासाठी सांगुन पुर्तता करून घेण्यास सांगीतले." तेव्हा ग्राम पंचायकत कार्यालयात ग्रामसेवक गवई हे सुध्दा हजर होते. त्यांनी सुध्दा कागदपत्राची पुर्तता करणे बाबत कळविले. सदरची माहीती मी सापळा पथकास दिली व कागदपत्राची पुर्तता झाल्यानंतर लोकसेवक सरपंच ज्योती पवार मॅडम यांना भेटण्याचे ठरले होते.
त्यानंतर दिनांक 12/05/2023 रोजी मी कागदपत्राची पुर्तता पुर्ण करून पोलीस निरीक्षक धुतराज मॅडम यांना कळविल्याने ते सलगरा बु. येथील महादेव मंदीरा जवळ आले. मी पण तेथे हजर आलो. त्यावेळी तेथे पहीला पंच नामे माधव बिडवे यांचा अपघात झाल्याने त्याचे ठिकाणी त्याचे कार्यालयातुन बदली पंच म्हणुन शिवाजी वाघमारे हे हजर आले. त्यांची मला पोलीस निरीक्षक धुतराज मॅडम यांनी ओळख करुन दिला. आणि मी दिलेली तक्रार मी त्यांना तोंडी सांगीतली. व त्यानी टाईप केलेली तक्रार वाचुन पाहीली. त्यानंतर धुतराज मॅडम यांनी लोकसेवक ज्योती पवार मॅडम हे कुठे भेटतील असे विचारले असता त्यांनी कळविले की, मी ग्रामपंचायत कार्यालयात जावुन पाहुन आलो ती आली नाही त्यानंतर आम्ही सर्वानुमते लोकसेवक ज्योती पवार यांना फोन करून बोलण्याचे ठरल्याने मी माझा मोबाईल नंबर 9552292927 वरून लोकसेवक ज्योती पवार यांचा मोबाईल नंबर 7559399261 वर फोन केला असता संरपंच ज्योती पवार मॅडम हया उदया सलगरा येथे येत असल्याचे कळविल्याने तसा तिचा फोन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करून घेतला आहे.
आज दिनांक 13/05/2023 रोजी माझा मोबाईल क्रमांक 9552292927 वर लोकसेवक सरपंच ज्योती पवार हिचा मोबाईल क्रमांक 7559399261 वरून सकाळी 08.57 वाजता फोन आला की, व पवार मॅडम आजच सलगरा खू. येथील ग्रामपंचायत कार्यालयात येत आहे असे कळविल्याने मी तात्काळ सदरची माहीती पोलीस निरीक्षक धुतराज मॅ‌ॅडम यांना दिली. त्यांनी सापळा पथक व पंचा सह सलगरा बु. ता.मुखेड जि.नांदेड येथील महादेव मंदीराच्या परीसरात येवुन मला फोन लावला असता मी सदर ठिकाणी हजर गेलो. मला पोलीस निरीक्षक धुतराज मॅडम व सापळा पथकातील टिमने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून मी व पंच नामे शिवाजी वाघमारे असे आम्ही माझे षाईन मोटार वाहन क्रमांक एम एच 26 आर 342 ने पडताळणी कामी 12.36 वाजता ग्रामपंचायत कार्यालय सलगरा ख्रु ता.मुखेड जि.नांदेड येथे गेलो असता मला ग्राम पंचायत सलगरा ख्रु ता.मुखेड जि. नांदेड कार्यालयात सरपंच पवार मॅडम व ग्रामसेवक गवई हे भेटले. मी सरपंच मॅडम व ग्रामसेवक गवई यांना माझ्या आईचे नावे रमाई योजने अंतर्गत असलेल्या घरकुलाच्या कामा करीता लागत असलेले कागदपत्र दिले , असता त्यानी माझे कागदपत्राची पाहणी केली. व कामासंदर्भाने चर्चा करत लोकसेवक सरपंच पवार मॅडम यांनी मला पंचासमक्ष त्याचे हाताच्या बोटाने इषारा करत आठ चा आकडा दाखवित आठ हजाराची मागणी केली तसेच तोंडी सूध्दा आठ हजार रूपयाची मागणी केली ,तसेच ग्रामसेवक यांनी सूध्दा "किती ठरल" अस हळू आवाजात बोलत " जिल्हा परीशदला काम पोहचण्याच काम माझे" म्हणत दोघांनी आठ हजार रूपयाची मागणी केली, आठ हजार खुप होतात असे मी म्हणालो असता त्यांनी मला आठ हजाराची मागणी करून तडजोडी अंती पाच हजार रूपये आणुन देण्याची मागणी केली. ग्रामसेवक गवई यांनी माझे कागदपत्रे पाहुन मला बॅक पास बुकची छायांकीत प्रत आणुन दे आणि तुला पैसे दयावे लागतील मी तुझी फाईल जिल्हा परीशद कार्यालया पर्यन्त पाठविण्याची जिम्मेदारी माझी असे सांगीतले. पाच हजारच आज आणुन दे असे सांगुन मला पाच हजार रूपयाची मागणी केली. मी त्यांना सध्या माझ्या कडे पैसे नाहीत आणुन देतो असे कळवुन थोडया वेळात पैसे आणुन देतो असे सांगुन सापळा पथक थाबलेल्या ठिकाणी मी व पंच असे माझ्या मोटार सायकलवर गेलो. व झालेली हाकिकत सांगीतली.
त्यानंतर माझ्या जवळील व्हाईस रेकॉर्डर मधील झालेले संभाषण सापळा पथकाने ऐकले त्यामध्ये लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्याचे निश्पन्न झाल्याने मला सापळा पथकातील अधिकारी यांचेकडे 500 /- रूपये दराच्या 10 नोटा पाच हजार रूपये दिले , दिलेल्या 500 /- रूपये दराच्या 10 नोटांना अँथेसिन पावडर लावुन माझ्या पॅटच्या उजव्या खिषात टाकुन लोकसेवक यांनी पैसे स्विकारल्यानंतर माझ्या डोक्यावरील रूमाल हा हाताला गूंडाळुन हात खिशात ठेवण्याचा इषारा करण्यास कळविले. तसेच माझ्या वरील मोबाईल नंबर हा सापळा पथकातील अधिकारी व अमंलदार यांचे कॉन्फरन्स कॉलवर संपर्कात होते.
त्यानंतर मला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून देवुन पंच क्रमांक एक शिवाजी वाघमारे यांचे सोबत 13.20 वाजता माझ्या मोटार सायकलवर आम्ही ग्रामपंचायत कार्यालय सलगरा ख्रु ता.मुखेड जि.नांदेड येथे रवाना झालो. तसेच आमचे पाठोपाठ थोडया अंतरावर सापळा पथक होते. आम्ही ग्रामपंचायत कार्यालय येथे गेलो असता ग्रामपंचायत कार्यालय हे बंद होते. ग्रामपंचायत कार्यालय हे बंद असल्याचे सांगीतल्याने त्यांनी मला कॉन्फरन्स कॉलवर सांगीतले की, आपण लोकसेवक पवार मॅडम यांना फोन करून बोला असे कळविले असता मी लोकसेवक



Scanned with OKEN Scanner

ज्योती पवार मॅडम यांना फोन लावला असता ते मला सलगरा ग्रामपंचायत कडुन सलगरा फाटा कडे जाणा-या रोडवरील ब्रिजच्या उजव्या बाजुस एक मंदीराच्या बाजुला शेतात येण्यास सांगितले होते, तेथे बोलावले असता मी पंचासह तेथे गेलो. लोकसेवक सरपंच ज्योती पवार मॅडम, ग्रामसेवक गवई, हे हजर होते. त्यावेळी लोकसेवक सरपंच ज्योती पवार मॅडम हया बाजुला आल्या मी त्यांना कामा बाबत परत सांगुन आपण सांगीतल्या प्रमाणे पाच हजार रूपये आणले आहेत. ते आपण मोजुन घ्या असे सांगीतल्याने तेव्हा 13.55 वाजले होते. त्यांनी सदरची रक्कम ही ताब्यात घेवुन हातातच ठेवली होती. त्यानंतर लगेच लोकसेवक सरपंच ज्योती पवार व ग्रामसेवक गवई हे त्यांचे मोटार सायकल क्रमांक पॅशन प्रो लाल रंगाची एम.एच 26 एक्स 9050 वर निघाले असता आम्हास तक्रारदार यांने आम्हास ठरल्या प्रमाणे इषारा केल्याने सापळा पथकातील आमचे आजु बाजुस रोडवर थांबलेल्या अधिकारी व अमंलदार यांनी त्यांना तात्काळ थांबवून आणि एसीबी ची शासकीय जिप त्यांचे मोटारसायकलसमोर आडवी उभी करून पंचासमक्ष लोकसेवक सरंपच ज्योती पवार व ग्रामसेवक गवई यांना षासकिय वाहनात घेवुन पंचासमक्ष अंगझडती केली असता त्यांनी माझ्या जवळील 500 रूपये दराच्या 10 नोटा (पाच हजार रूपये )लाच म्हणुन स्वीकारल्याचे निश्पन्न झाले आहे.

तरी आज दिनांक 13/05/2023 रोजी माझ्या आईच्या नावावर रमाई घरकुल माझ्या आईच्या नावे योजने अंतर्गत घराचा प्रस्ताव मंजुर करण्या करीता लोकसेवक सरपंच ज्योती पवार व ग्रामसेवक षांताराम देविदास गवई यांनी काम करण्या करीता एकत्रीत आठ हजार रूपयाची मागणी केली. व तडजोड अंती पाच हजार रूपये स्वीकृत केले.यातील दोन्ही लोकसेवक यांनी लाचेची मागणी करून लाचेची रक्कम स्विकारून पदाचा दुरूपयोग करून स्वतःचा आर्थीक फायदा करून घेतला म्हणुन लोकसेवक सरपंच ज्योती खंडेराव पवार वय 40 वर्ष व्यवसाय सरपंच सलगरा ख्रु ता.मुखेड जि.नांदेड व शांताराम देविदास गवई वय 52 वर्श व्यवसाय ग्रामसेवक, सज्जा सलगरा ख्रु ता. मुखेड जि.नांदेड यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये योग्य ती कायदेशीर कार्यवाही होणेस विनंती आहे.

हि फिर्याद दिली सही

( रामेष्वर पूंडलिक घायाळ )

रा. सलगरा ख्रु ता.मुखेड जिल्हा नांदेड

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद** केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

RAMESH CHIMAJI WAGH(I (Inspector)) / 21018 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**



Scanned with OKEN Scanner